**<u>ठळक बातम्या</u>**

- एआय इम्पॅक्ट समिट हे कृत्रिम बुद्धिमत्तेचा जगभरात उपयोग करण्याच्या दिशेने महत्त्वाचं वळण ठरल्याचं प्रधानमंत्र्यांचं मन की बात मधे प्रतिपादन

- विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला विरोधकांचा चहापानावर बहिष्कार

- भारत-अमेरिका व्यापार कराराबाबत वॉशिंग्टन इथं होणाऱ्या वाटाघाटींचं वेळापत्रक पुन्हा आखण्याचा दोन्ही देशांचा निर्णय

**आणि**

- पुरुषांच्या क्रिकेट टी ट्वेंटी विश्व चषक स्पर्धेत आज भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यात लढत

<><><><><>

नवी दिल्ली इथं नुकतीच पार पडलेली इंडिया एआय इम्पॅक्ट समिट अर्थात जागतिक कृत्रिम बुद्धिमत्ता प्रभाव शिखर परिषद ही आगामी काळात कृत्रिम बुद्धिमत्तेचा उपयोग जगभरात कसा केला जाईल, या दिशेनं एक महत्त्वाचं वळण ठरल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. प्रधानमंत्र्यांनी आज ‘मन की बात’ या कार्यक्रमातून देशवासीयांशी संवाद साधला. हा या कार्यक्रमाचा १३१ वा भाग होता. या परिषदेत अमूलच्या बूथवरचं प्राण्यांवर उपचार आणि देखरेखीसाठीचं कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित उपकरण तसंच आपले प्राचीन ग्रंथ, प्राचीन ज्ञान, आपली हस्तलिखितांच्या जतनासंदर्भातलं ॲप्लिकेशन, या भारताच्या दोन उत्पादनांनी जगभरातील नेत्यांना प्रभावित केल्याचं त्यांनी सांगितलं. या शिखर परिषदेत संपूर्ण जगाला भारताची कृत्रिम बुद्धिमत्तेच्या क्षेत्रातील अद्भुत क्षमता

पाहायला मिळाली असं ते म्हणाले. या शिखर परिषदेत तरुणांचा उत्साहवर्धक सहभाग पाहायला मिळाल्याचं ते म्हणाले.

आज देश गुलामीच्या प्रतीकांना मागे टाकून भारतीय संस्कृतीशी संबंधित असलेल्या गोष्टींना महत्त्व देऊ लागला आहे. याच दिशेचं पुढचं पाऊल म्हणून उद्या २३ फेब्रुवारीला राष्ट्रपती भवनात राजाजी उत्सवा दरम्यान सी. राजगोपालाचारी यांच्या प्रतिमेचं अनावरण होईल अशी माहिती त्यांनी दिली. ब्रिटीश वास्तुविशारद एडविन यांच्या प्रतिमेऐवजी राजाजींची प्रतिमा तिथे लावली जाईल असं त्यांनी सांगितलं.

देशात अवयवदानाविषयीची जागरूकता सातत्यानं वाढत असल्याचं त्यांनी नमूत केलं. याच संदर्भाने अलीकडेच केरळमध्ये अवघ्या दहा महिन्यांच्या आलिन हिचा मृत्यू झाल्यानंतर तिच्या पालकांनी आलिनच्या अवयवदानाचा निर्णय घेतल्याची घटना त्यांनी श्रोत्यांना सांगितली. अवयवदानामुळे गरजूंना नवं आयुष्य मिळाल्याची देशभरातली अनेक उदाहरणं त्यांनी आज श्रोत्यांसमोर मांडली.

ऑनलाईन फसवणुकीबद्दलही त्यांनी संवाद साधला. डिजिटल अरेस्ट विषयी देशात जागरूकता वाढली असली, तरी आजही अशी प्रकरणं घडत असल्याच्या पार्श्वभूमीवर याबाबतीत सगळ्यांनी सतर्क राहण्याचं आवाहन त्यांनी केलं. आपला ओटीपी कोणासोबतही सामायिक न करणं, सतत पासवर्ड बदलणं आणि अधिकृत ॲपचा वापर करणं असे सल्ले त्यांनी दिले. बँकांद्वारे ग्राहकांच्याच सुरक्षेसाठी केवायसी अर्थात ग्राहकांच्या तपशीलाची पुनर्पडताळणी होत असते, त्यामुळे अशा प्रक्रियेबद्दल चीड न बाळगता सहकार्य करण्याचं आवाहन त्यांनी केलं.

**होल्ड बाईट - MKB MODI KYC**

यादृष्टीनंच भारतीय रिझर्व्ह बँकेच्या वतीनं पार पडलेल्या आर्थिक साक्षरता सप्ताहाची माहितीही त्यांनी दिली.

आपले शेतकरी केवळ अन्नदाता नाहीत, तर ते आपल्या भूमीचे खरे साधक आहेत असं प्रधानमंत्री म्हणाले. देशातला शेतकरी पारंपरिक पद्धत आणि तंत्रज्ञानाच्या सोबतीनं वाटचाल करतो आहे, असं त्यांनी सांगितलं. याबाबतीतल्या यशस्वी प्रयोगांची उदाहरणंही त्यांनी श्रोत्यांसमोर मांडली. आपले शेतकरी केवळ उत्पादनावरच नाही, तर गुणवत्ता, मूल्यवर्धन आणि नव्या बाजारांवरही लक्ष देत असल्याबद्दल त्यांनी आनंद व्यक्त केला. आता तर कृषी उत्पादनं हवाई मार्गानंही अगदी सहज परदेशात पोहोचत असल्याचं ते म्हणाले.

आगामी रमझान आणि होळीच्या सणात व्होकल फॉर लोकलचा मंत्र जपावा आणि देशाला आत्मनिर्भर बनवण्यात हातभार लावावा, असं आवाहन त्यांनी केलं. येत्या २४ फेब्रुवारीला तामिळनाडूच्या माजी मुख्यमंत्री दिवंगत जयललिता यांची जयंती असल्याचं स्मरण करत त्यांनी आदरांजली वाहिली.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी  यांनी आज उत्तर प्रदेशात नमो भारत ट्रेन आणि मीरत मेट्रो सेवेचं उद्घाटन केलं. शताब्दी नगर रेल्वे स्थानकावरून त्यांनी मीरत मेट्रो आणि नमो भारत ट्रेनला हिरवा झेंडा दाखवला. प्रधानमंत्री मोदी आणि उत्तरप्रदेशाचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी यावेळी मेट्रोमधून प्रवासही केला. १८० किलोमीटर प्रति तास वेगानं धावणारी नमो भारत ट्रेन देशातली पहिली जलद वाहतूक प्रणाली आहे. त्याचप्रमाणे मिरत मेट्रो ही ताशी १२० किलोमीटर वेगानं धावणारी सर्वात जलद मेट्रो आहे.  यावेळी प्रधानमंत्र्यांनी ८२ किलोमीटरच्या दिल्ली- मिरत नमो भारत कॉरीडरचंही लोकार्पण केलं.  याशिवाय प्रधानमंत्र्यांनी १२ हजार ९३० कोटी रुपयांच्या विकासकामांचं उद्घाटन केलं.

त्यानंतर प्रधानमंत्री मोहिद्दीनपूर इथं विविध विकासकामांचं उद्घाटन आणि पायाभरणी करणार आहेत. तसंच जनसभेला संबोधित करतील.

**<><><><><>**

विधीमंडळाचं अर्थसंकल्पीय अधिवेशन उद्यापासून मुंबईत सुरु होत आहे. त्याच्या पूर्वसंध्येला सत्ताधारी पक्षानं आयोजित केलेल्या चहापानावर विरोधी पक्षांनी बहिष्कार टाकला आहे. प्रचंड बहुमतामुळे सत्ताधारी पक्षाचं वर्तन सभ्यपणाचं नाही, जिथं लोकशाहीचा मान राखला जात नाही तिथं आपण चहापानाला जाणार नाही असं शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते भास्कर जाधव यांनी सांगितलं. उद्याच्या अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर विरोधी पक्षांनी आज मुंबईत आयोजित केलेल्या वार्ताहर परिषदेत ते बोलत होते. भारत - अमेरिका करार हा पूर्णपणे शेतकरी विरोधी असल्याची टीका जाधव यांनी केली. उप मुख्यमंत्री अजित पवार यांच्या अपघाती मृत्यूबाबतही अनेक शंका आहेत, याची चौकशी करण्याची मागणी त्यांनी केली. राज्यातली बेरोजगारी, कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न, रखडलेले विकास प्रकल्प, शेतमालाला मिळणार अल्प मोबदला या आणि इतर मुद्द्यांवर काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी यावेळी टीका केली. माजी मंत्री आदित्य ठाकरे, काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार, सतेज पाटील यावेळी उपस्थित होते.

दरम्यान, मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस येत्या ६ मार्चला राज्याचा अर्थसंकल्प सादर करतील. उप मुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनानंतर मुख्यमंत्र्यांनी अर्थखातं स्वतःकडे ठेवलं असून ९ कोटी रुपयांच्या तुटीचं आव्हान अर्थसंकल्पासमोर आहे.

**<><><><><>**

भारत-अमेरिका व्यापार कराराबाबत वॉशिंग्टन इथं होणाऱ्या वाटाघाटींचं वेळापत्रक पुन्हा आखण्याचा निर्णय दोन्ही देशांनी घेतला आहे. दोन्ही देशांमधल्या व्यापार कराराला अंतिम रूप देण्यासाठी उद्यापासून ही बैठक सुरु होणार होती. भारतीय शिष्टमंडळ या तीन दिवसीय बैठकीची सुरुवात करणार होतं. व्यापार

करारासाठीच्या वाटाघाटींमध्ये भारतातर्फे वाणिज्य मंत्रालयातले सहसचिव दर्पण जैन प्रमुख भूमिका बजावणार आहेत.

अमेरिकेच्या व्यापार धोरणावरून नुकत्याच झालेल्या घडामोडी आणि त्याचे परिणाम, याचं दोन्ही बाजू मूल्यांकन करतील, आणि त्यानंतर भारतीय पथकाची अमेरिका भेट निश्चित केली जाईल, असं वाणिज्य मंत्रालयानं जारी केलेल्या निवेदनात म्हटलं आहे.

**<><><><><>**

तामिळनाडूमध्ये चेन्नई इथल्या गोल्डन बीचवर काल झालेल्या दुर्घटनेत वाहून गेलेल्या ३ जणांपैकी एक युवती भंडारा जिल्ह्यातल्या मोहाडी तालुक्यातली असून, स्थानिक प्रशासनानं तिच्या कुटुंबियांशी संपर्क साधला आहे. चेन्नईमधल्या एका आयटी कंपनीत काम करणाऱ्या महाराष्ट्रातल्या १५ तरुणांचा गट काल गोल्डन बीच जवळच्या समुद्रात गेला होता. त्यावेळी उसळलेल्या लाटांच्या प्रवाहात ३ जण वाहून गेले. त्यापैकी एका युवकाला बचाव पथकानं सुरक्षितपणे बाहेर काढलं, तर एक जण अद्याप बेपत्ता आहे. बेपत्ता युवक जळगाव जिल्ह्यातला असून, त्याचा शोध सुरु आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस स्थानिक प्रशासनाच्या संपर्कात असून, दुर्घटना बाधित कुटुंबांना सर्वतोपरी मदत पुरवली जाईल, असं राज्य सरकारनं जारी केलेल्या निवेदनात म्हटलं आहे.

**<><><><><>**

कुर्ला-सीएसएमटी, माहिम काॅजवे आणि वाकोला नदीजवळ मुंबई महानगर पालिकेनं पंपिंग स्टेशन उभारणीसह अन्य कामांना सुरुवात केली आहे. या कामांमुळे येत्या पावसाळ्यात कुर्ला-शीव रेल्वे स्थानका दरम्यान रुळांवर पाणी भरणार नसल्याचा दावा पालिका प्रशासनानं केला आहे. कुर्ला-शीव रेल्वे स्थानका

दरम्यान दरवर्षी पावसाळ्यात पुराचं पाणी रुळावर साचून रेल्वे वाहतुकीचा मोठा खोळंबा होतो. मात्र, या कामांमुळे हा परिसर आता पूरमुक्त होणार आहे.

<><><><><>

भंडारा तालुक्यात शहापूर इथं नुकत्याच झालेल्या पशु प्रदर्शनाला शेतकरी आणि पशुपालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या प्रदर्शनात गायी, म्हशी, बैल, शेळ्या तसंच इतर पाळीव प्राणी होते. पशुधनाचं आरोग्य, देखभाल आणि उत्पादन कसं वाढवावं याचं मार्गदर्शन या प्रदर्शनात सहभागी तज्ज्ञांनी केलं. पशुसंवर्धन विभागाच्या अधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांना आधुनिक पशुपालन तंत्रज्ञान, लसीकरण, कृत्रिम रेतन आणि पशुखाद्य व्यवस्थापनाबाबत मार्गदर्शन केलं.

<><><><><>

राज्यातल्या २८ फेब्रुवारी रोजी मुदत संपणाऱ्या ग्रामपंचायतींमध्ये विद्यमान सरपंचांनाच प्रशासक म्हणून नियुक्त केलं जाणार आहे. त्यांच्या मदतीसाठी उप सरपंच आणि सदस्यांची प्रशासकीय समिती कार्यरत राहाणार असून ही नियुक्ती पुढच्या सहा महिन्यांसाठी किंवा निवडणुका पूर्ण होईपर्यंत लागू राहणार आहे. या संदर्भात दाखल झालेल्या एका याचिकेच्या सुनावणी दरम्यान मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने हे आदेश दिले आहेत.

<><><><><>

गोंदिया जिल्ह्याच्या सालेकसा तालुक्यातील पिपरिया इथले लष्कर सुभेदार नेतराम कटरे हिमाचल प्रदेशात कर्तव्य बजावताना शहीद झाले. त्यांच्या पार्थिवावर आज त्यांच्या मुळ गावी शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी परिसरातले हजारो नागरिक उपस्थित होते. यावेळी शहीद सुभेदार नेतराम कटरे यांना २१ तोफांची सलामी देण्यात आली.

<><><><><>

पुरुषांच्या क्रिकेट टी ट्वेंटी विश्व चषक स्पर्धेच्या सुपर एट मधे आज  दुपारी तीन वाजता इंग्लड आणि श्रीलंका याच्यात सामना होणार आहे. श्रीलंकेने नाणेफेक जिंकन इंग्लंडला फलंदाजीसाठी पाचारण केलं आहे.

संध्याकाळी ७ वाजता अहमदाबाद इथं भारत विरुद्ध दक्षिण अफ्रिका यांच्यात लढत होणार आहे.

**//<><><><><>//**